काव्य
१४५४

# साधना

## व इतर कविता.

वर्षप्रतिपदा

१८५३

७८
सन १९३१

—सुहृद्चम्पा—

REFBK-0004503
REFBK-0004503

कला-मण्डल,
मुंबई.

किंमत ४ आणे.

# साधना

## व इतर कविता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 24375 वि 31104
क्रमांक 1752 नों: दि: 23/3/4

—सुहृद् चम्पा

REFBK-0004503
REFBK-0004503

" माझा मऱ्हाटाचि बोल निकें ।
परी अमृतातेंही पैजा जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥"

—श्री ज्ञानेश्वर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 4503

वर्षप्रतिपदा

१८९३

प्रकाशक :

**पुरुषोत्तम शिवराम रेगे**
पारेख स्ट्रीट; सँढर्स्ट रोड,
मुंबई ४.

( सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन )

मुद्रक :

**व्ही. प्रभा आणि कंपनी,**
प्रभाकर छापखाना,
सॅन्डर्स्ट रोड, ट्राम टरमिनस,
गिरगांव, मुंबई.

# अनुक्रमणिका

वि: ..........
क्रमांक .......... नोंः दिः ..........

| क्रम. | शीर्षक. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| | आत्म-समर्पण ... ... | ५ |
| | निवेदन ... ... ... | ७ |
| १ | साधना ... ... ... | ८ |
| २ | पुनरावृत्ति ... ... ... | १० |
| ३ | एकदां चम्प्–चुम्बन घेणें ... ... | ११ |
| ४ | कबुली ... ... ... | १२ |
| ५ | आठवण .... ... ... | १४ |
| ६ | विरह ... ... .... | १६ |
| ७ | अबोला ... ... ... | १८ |
| ८ | ताटातूट ... ... ... | २० |
| ९ | ? ... ... ... | २३ |
| १० | आशा ... ... ... | २४ |
| ११ | आशाभङ्ग .... ... .... | २५ |
| १२ | जगाची रीतच बहु न्यारी ... ... | २७ |
| १३ | मुग्धा ... ... ... | २८ |
| १४ | नृत्य ... ... .... | २९ |
| १५ | सन्ध्या-रजनी ... .... | ३० |
| १६ | अपूर्तता .... .... ... | ३१ |
| १७ | क्षितिजावर लाली ... ... | ३३ |

| क्रम. | शीर्षक. | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| १८ | मोंतियांची शाहिरी | ... | ... | ३४ |
| १९ | विनवणी .... | ... | ... | ३५ |
| २० | प्रीतीचें मार्दव | .... | ... | ३७ |
| २१ | स्वागत ... | ... | ... | ३९ |
| २२ | चाळा ... | .... | ... | ४१ |
| २३ | ओढ ... | .... | .... | ४३ |
| २४ | भारत स्वतन्त्र हा झाला | .... | .... | ४४ |
| २५ | अञ्जलि ... | ... | ... | ४६ |

---

१—टीप. खालील कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

| शीर्षक | स्थळ | नांव |
|---|---|---|
| साधना | The Elphinstonian | पुरुषोत्तम |
| जगाची रीत | ,, | कृष्णा-कुमार |
| आशा | ,, | सुहृद्चम्पा |

२—टीप. काहीं कविता 'Free Verse' या सदराखालीं मोडतील. मराठींत 'Free Verse' ला 'सहज-काव्य' ह्मणतां येईल.

---

## आत्म-समर्पण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम ........................ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

आपल्या
सहज मुग्ध-माधुर्यानें,
——,
तूंच नां
माझ्या जीवितांत
क्रान्ति
घडवून आणिलीस ?

सुहृद् चम्पा.

"पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥ "

# निवेदन

**हृदयांतील** नाजुक भावनांना यथोचित परिवेष देऊन जीवाची करमणूक करून घेणें, हेंच कुठल्याही कलेचें उद्दिष्ट असतें. शुष्क नियमांचें बन्धन कलेला केव्हांही हितावह होत नाहीं. स्थूलमानानें भावना आणि कृति यांचा मेळ बहुतांशी बसतो, आणि मुळांतच जर प्रतिभेची वानवा नसली तर योग्य नाद-रूपाचा उगम होण्यास विशेष आयास पडत नाहींत.

हें झालें सर्वसाधारण. प्रस्तुत कृतींत याची कितपत सत्यता पटते हें ठरविणें केवळ प्रेमळ वाचकवर्गावरच अवलंबून आहे. स्वतःची एक विशिष्ट प्रकारची आवड जगासमोर मांडण्यास फाजील भीडेचा उपयोग होत नाहीं, हें सिद्धच आहे. अशा वेळीं कर्तव्य म्हणूनच इष्ट कार्याची पूर्तता करण्यास झटावें लागतें. टीका झाली तरी कोणाला नको असते ? जरी एखाद्या विवक्षित मार्गाचें इष्टानिष्टत्व बव्हंशी कालच ठरवितो, तरीही योग्य टीकेचा परिणाम—नकळत कां होईना—होतो हें अगदींच नाकबूल करतां येणार नाहीं. पण दूरदृष्टि व सहृदयता यांचाच जर अभाव असला तर त्याला कोण काय करणार ?

मकरसङ्क्रान्त.
शके १८५२.

सुहृद् चम्पा.

साधना:

# साधना

कल्पनेची स्वैर भरारी
शुष्क समाधानें होत घाबरी
जेथें जीवच स्वत्व-भावना विसरला
तेथें द्वैत-अद्वैताचा वाद नुरला
मग डोलारा उभारला
हृद्–ब्रह्माचा
सूक्ष्म–तम परिमाणुवरी
ती लागतांच
शुद्ध प्रेमाची आंच
हृदयाला ओळख पटली
भासलें
येथेंच कार्य सम्पलें
जीवाचें
परि चिच्छक्तीची चालना
दाखवी अमित चमत्कार—
पूर्ण-ब्रह्माचा साक्षात्कार

ग्रं. क्र. ४५०३

साधनाः

फळली प्रीतीची साधना
हृदयाची भावना
सत्–चित्–आनन्द—
जीवाचे तुटती बन्ध
हृन्मीलना
नलगे दृश्य संवेदना

मुम्बई २८–३–३०

# पुनरावृत्ति

का अजुनी
लाजरें मुख ?
बघ इकडे—(" अं हं ")—
दिव्य जणुं माधुर्यच विकसलें
नाहीं मी हांसणार मग झालें ?
वद तर एकदांच मधु—बाले—
( "मी नाहीं हं" )—
" कित्ती सुरेख !"—
नच लाजुनी

मुंम्बई १।१।३०

# एकदां चम्प्—चुम्बन घेणें

नैराश्याचा वारा सुटला
जिव बावरला
मधेंच वाटे चमके विद्युल्लता
परि येईल कां तो समय अतां ?
कशास गाणें
उदासवाणें :
जर सुमनांची रासच करणें
चुम्बित, चुम्बित सुगन्ध घेणें
मग कां आग लावुनी देणें ?
बोल मनाचे
मोल जिवाचें
कृति ठरविते ध्येयः
ध्येय ठरवितें कृति—
एकच कृतिः
एकच ध्येय—
अर्धोन्मीलित
कलिका हांसत—
( कुण्या जिवाचें लेणें ? )—
एकदां चम्प्....चुम्बन घेणें

मुम्बई १८।१।३०



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
२६३५५ काव्य

# कबुली

माझें सौख्य-निधान
माझें प्रेम-निधान
तूं एकलीच हें जाण

शुष्क जाहलें जरि जीवित हें
प्रेम-सरित् तव त्यांतुनि वाहे—
भीषण परिस्थितींतें साहे
सखे, तुझाच म्हणून

भग्न जगाच्या क्षितिजावरतीं
भटकण्या जैं मज वाटे क्षिति
तैं तेथेंही तुझीच सङ्गति
कल्पितें माझें मन

लपण्डाव हा ऐसा खेळत
जरी अनुभवणें सर्वस्वान्त
खुल्या दिलाची हीच खिरापत
हेंच आत्म-समर्पण

नाजुक हृदयांतील भावना
हलकाच उकलतांच यातना–
कितीक होती तरि पर्वा ना
करीन सखे ग, गान

मिठगांव, ९-५-३०

# आठवण

मनची माया
उमटली मुखावरती
नयन बोलती
अधर हांसती–
मुग्ध-मधुर हे तव
हावभाव
जातील मग कां वांया ?
हा उत्कटतेचा उल्हास
तूं उधळ असाच, सुहास
या मम भणङ्ग जीवाला
हा एकलाच
दिव्यत्वाभास
"रवि-किरणांहीं जर काळें केलें
तर कां उगाच कलिका
झुरणार ?
विरहाचा डोम्ब उसळला

तर पाहिजेच कां
हृदय-आहुति दिधली ?"
भावनांचें थैमान
नच तेथें क्षुद्र अभिमान–
येईल जडसृष्टीसही चैतन्य
हृदय-दैन्य
जाईल लयातें आपसुका
चालेल मग न कां
अक्षय्य आनन्दाचें आन्दोलन–
माधुर्य-माङ्गल्य मधु-मीलन ?
हरपूं दे भान
हें एकच आळवीत
प्रेम-सङ्गीत

मिठबांव, ११-५-३०

# विरह

फुलत्या कलिकेपरी
सखे, मद् हृदयीं हास्या पसरी

ना क्षणैक दिसणें मूर्त
कां म्हणुनी होणें आर्त ?
प्रेम-सम्पदा असे अमूर्त
नसांनसांतुनि त्या हास्याच्या
उठतिल लहरी लहरी

या जीविताच्या मोलानें
अथवा मञ्जु-मुग्ध गानें
जरि हें नाजुक लेणें देणें—
हृदय-दारिके, त्या हास्याची
येइल कां ग, सरी ?

चिच्छक्तीच्या कल्पकतेनें
मन मानें तें उभारणें :–
अस्फुट तूं तव आशिर्वचनें
उधळित जाणें हास्य-श्री ही–
प्रेम-वैखरी खरी

कुठला कसला विरह-भोग ?
सखे आठवेल कां तो ग ?
हाच आमुचा चिर-सञ्योग....
नच घडणाऱ्या भविष्यकालीं
आशा कां मग तरी ?

मुम्बई, २८-७-३०

# अबोला

स्वर अस्फुट—
किंचित् हलले न हलले ओष्ठ :
निमिषमात्र दिसली
धवल कुन्द–पङ्क्ति :
नाजुकशीच खळी
ही डाव्या गालावरती :
नयन दाविती
कोण्या आतुर अतृप्ततेचा अबोला ?
कोणता भाव मनीं उमलला ?
कां अजि चराचराची चेतना
जाहली जागृत ?
जें दिसें
तें भासें—
सत्यम्—शिवम्—सुन्दरम्.
हें रहस्य हृदयाचें
कां सदा हृदिंच बाळगायाचें ?

कां मानस-पूजा मौन–सुमानें बांधायाची ?
ही साधना कुण्या घरची ?
एकच शब्द :
मग चैतन्य सञ्चरणार—
माधुर्य सुसमुसणार—
पावित्र्य पसरणार—
हृदय–देवता——?
सर्वस्व विलीन होणार.

मुम्बई : २४–८–३०.

# ताटातूट

ती मोहक नजर भेदुनि गेली हृदया—
कोणता गूढार्थ मनीं भरला ?
अव्यक्त व्यक्त करण्याला
भाषा असमर्थ जाहली केधवां ?
अन् जरि अर्थच नाहीं तिजला
मग ही कटाक्ष—जादू अशी उगा उधळण्या
दिधला परवाना कोणी तुजला ?
' नाजुक मुरका :
मनास चरका: '
ठाऊका सिद्धान्त नाहीं कां सख—
( अथवा सम्बोधन कुठलें घेऊं ? )—
जा विसरुनि सारें
जें जें कांहीं घडलें—
( जणुं कांहींच नाहीं घडलें ! )—
तव स्मरणांत विस्मरण—
तव चिन्तनींच निश्चिन्त

हें हृदय होतें अजुनी.

आतां भावना साऱ्या तुडवुनि देऊं—
जे अननुभूत मनिं विचार उद्भवती
दडपुनि त्यांना टाकूं—
परस्परांना पुन्हां पाहतां
लटकें हास्य मुखीं आणूं—
जगांत मिरवूं
जणुं आह्मींच सुखाचे मक्तेदार—
विरहाचें थोताण्ड
स्वानुभवानें सिद्ध करूं—
— — — — —

कशास आतां गङ्गा—यमुना ?
पुरे झाली इतुकी तीर्थ-साधना :
हुन्दके कशाला आणिक हे वरती ?
सकल देह-यष्टि कशास ही थरथरते ?
पूर्वींचा धरणी-कम्प असे कां अपुरा ?
जे शब्द मुखीं घुटमळती

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ४५०३

ते तसेच दाबुनि
एकदां ठार करी या हृदया—

× × × ×

परि सखे—( आतां हेंच सम्बोधन )—
अन् हें असेंच ना टिकणार हृन्मीलन ?

मुम्बई : १८-९-३०.

# ?

नाजुक मोहक बिजली चमके
स्मित-साहाय्यित शोभा झळके—
मधु-विक्षेपनिं हृदय-हारिके
जीव गुङ्ग झाला.

चञ्चल-वीणा-सुस्वन-गतिका
नव-नव-अन्तर-विकसित-कलिका
वसन्त-भूषण-कोमल-लतिका
भास मनीं झाला

हृदय-मङ्गला विश्व-मङ्गलीं
प्रणय-रसें कां पुनीत केली ?
मनःस्फूर्तिची मूस ओतिली ?
कुण्या कविची कला ?

मुम्बई १६।११।३०

# आशा

अस्फुट जे विचार हृदिं कोन्दती—
बन्ध तटतटां तोडुनि येऊं बाहिर ते पाहती
क्षणोक्षणीं परि भीति वाटते मनीं—
चुकल्यामुकल्या स्वागत कैसें मिळणें मज साजणी ?
उल्हास, खेद, विवेक, अन् आशा—
भावना-कल्लोळ उभविण्या योजूं कुठली भाषा ?
जीव मुका हा सखये, बावरला—
मुग्ध-भाव जे हृदयीं उठती, ऐकविणें कोणाला ?
हैराण भटकतों पिसाटवाणें—
अव्याहत नैराश्य-सत्र हें असेंच कां चालणें ?
प्रणयाचा जरि विराम हा सम्प्रतीं—
झुरत, झुरत हें असेंच मरुं दे प्रेम-गीत जगतीं

\+ \+ \+ \+

मग वच कुठुनी कर्ण—पथीं नाचे—
" अननुभूत नव त्याग—गीत, प्रिय,
त्यांतुनि उमलायाचें !"

मुम्बई, १९-२०।११।३०

# आशा–भङ्ग

सुन्दर, कोमल
कलिका उमले—
मधु–मधु परिमल
हवेंत पसरे

निसर्ग–माता
स्नान घालितें—
बघ हे आतां
दंव–बिन्दू ते

वायु–सखा तो
हळूच येउनि
काय साङ्गतो ?—
कुणास ठावें !

गुञ्जारव करि
भ्रमर येउनी—
खिन्न मनीं परि
सखी आमुची.

हळूच बघते
वरती, खालीं—
कुणा पाहते
मङ्गल—समयीं ?

× × ×

कुठुनी येई
गान म्हणुनियां
उगाच जाई
लतिके जवळीं—

हृदय—भङ्गलें
दृश्य पाहुनी—
मधु-सुम गळलें
गीत गाउनी ! !

कराची, ३१-७-२७

# जगाची रीतच बहु न्यारी

लतिकेवरती साज चढविला कोमल पुष्पांचा
माण्डिला खेळ जणूं साचा
हितगुज करण्या जरि भृङ्गातें वेळच ना साधला
चुम्बन--योग कुठें गेला ?
गायन--लहरी हळूच येती मन तल्लिन झालें
परि तें गान कुठें सम्पलें ?
नाचतो अथाङ्ग मग वारा
खालीं पडला पुष्प--पसारा
सुचलें कांहींच ना भ्रमरा
गायन कुठचें ? श्रवण कशाचें ? गेलें सगळें दुरीं--
जगाची रीतच बहु न्यारी !

कराची, ?।१०।२९

# मुग्धा

ही बालिका
इवलीशी मुग्ध कलिका
चैतन्य–चमत्कृति
पावित्र्य–पूर्तता
सौन्दर्य–संहिता—
सहजतेनें जणुं इजला सजविली:
अस्फुट भावनांची मूर्ति—
कां कृति
पहिली वहिली
निसर्ग–मातेची ?
दर्शनें विरावल्या दुष्ट कामना—
विरङ्गुळा वाटे मना

मुम्बई: ९।४।३०

# नृत्य

नृत्याचें ग, तव लागे वेड
सखे, हें एकच पुरवी कोड.

लहरीवरती लहरी येती
हृदय-सागरा येई भरती
झुलती कितीक माणिक-मोती
विश्व-नर्तना ही जणूं गवसली जोड.

प्रणय-नौका बघ हेलावते
साथ तरल लाटांसह धरिते
पूर्णत्वाचें शीड फडकतें—
गमतीनें वारा उडवुनि देई झोड.

आन्दोलन हें प्रेम-सुधेचें
मर्यादा नच; नौका नाचे—
अविरत रत्नाकर प्रियेचें—
लोंचट तोही मग घेई चुम्बन गोड.

नौका होई खालीं वरतीं
अमर्याद लाटाहि नाचती
सागर-नौका खेळ खेळती—
मीलन झालें—काळाची चाले दौड.

मुम्बई: ६।४।३०

# सन्ध्या-रजनी

दिव्य ही कोठली बाला
अश्रूंची मौक्तिक–माला
घेउनी
सहज ललित हळुंच हांसुनी
मधु–भाव दाविते मनिंचा ?—
परि मग मोत्यें कुणि विखुरलीं ?

× × × ×

पसरे जरि अतां शान्तता—
सर्वत्र भीषण शान्तता
राहिलें
दलित-हृदय-कमल एकलें—
तो भाव एकला उरला :
मौक्तिक-तारा नभिं हांसल्या.

मुम्बई : २।४।३०.

# अपूर्तता

( शुद्ध प्रेम हाच ध्येयीभूत विषय झाल्यावर प्रेमी जीवाला
असें कां वाटूं नये ? )

रजनी–बाला
गाइ कशाला
ठरत स्वर जर तन्त्रीवर नाहीं ?
पडसाद कुठुनि
येत नभाङ्गणिं ?—
प्रेम-साङ्गता पूर्ण कधीं जाहली ?
नच प्रेम-साङ्गता :
चिरम् शून्यता—
भग्न मनाला उत्सह देण्या
विश्व हांसणार
असेंच गाणार—
प्रेम-साङ्गता अपूर्त जरि राही

\+ \+ \+

पावित्र्य-शक्ति–
सौन्दर्य-मूर्ति
विश्व-मङ्गला सदैव विलसावी—
तद्-हृदयान्तरिं
ज्या मधु-लहरी
प्रेम-जागृति सदैव तैं द्यावी—
प्रेम-मुग्धता
अन् अपूर्तता
एकतानतें सदैव निवसावीं––

मुम्बई : ३१।१।३०.

# क्षितिजावर लाली

सङ्केत-बोली उमलली
गहिरी झुलत आलवेली--
हांसत क्षितिजावर लाली
प्रेम-पूर्ति कां नभोमण्डलीं
एकाकीं दाटली ?

यत्नांची झाली खैर
अन् प्रणयाचा लाचार
झाला ह्मणुनी कां स्वैर ?
एकाच चुम्बनीं अधीर होउनि
भडकविली भामिनी ?

\+ \+ \+ \+

मधु-मधुर भारुनी पाशां
रक्ताची करुनी भाषा
विखुरली भंवती आशा
अमित जनांना भूल पाडुनी
विहसे मनकवडी.

मुम्बई : ९।१।३१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६३६४५ वि. काव्य...
क्रमांक ९५५४८ नों: दि: ३३।३।६०

# मोतियांची शाहिरी

उधळियला गीत-रङ्ग
जीव सखे, होत दङ्ग—
शान्तता भरे नितान्त
गान-लुब्ध विश्वजात.

चञ्चल आलाप येत
विकल हृद्-बन्ध होत—
गीत-स्वर एकवटुनि
भाव येत कां उमळुनि ?

अन्तरिचें गीत खुले
हृदयाला हृदय मिळे—
अमोल अतां आंवरी
मोतियांची शाहिरी

मुम्बई: १४।१।३१

# विनवणी

जगविली आजवर माया
जीवित-जादू जिङ्काया
परि फोल जरी ती ठरणें--
स्मृति अशीच ही चिरकाल.

× × × ×

प्रीति-सुधा-सङ् कल्पानें
जव खुलली लतिका-सुमनें---
वाऱ्यानें अफाट जगतीं
कां अशींच तीं झडणार ?

रजनी-नाथ दूरावला
कुमुदिनी कातरा बाला---
कुठवर हृदया सोशिकता
उमळून अतां पडणार

मधुर-कल्पना एकान्तीं
पुन्हां उजळितां ये कान्ति---
स्वप्न-सृष्टी खरी करोनी
जिवलगा, सान्ध मृदु-भङ्ग

मूक मम प्रेमाची बोली
ना जरि सङ्कोचें उमटली---
कां शल्य मनीं हें धरिलें,
स्त्री-हृदय-भाव-मर्मज्ञा ?

प्रीति-पुष्पाञ्जलि वाहिली
होत जरि जीवाची काहिली- -
ठावें तुलाच शान्तविणें
निज-प्रेम-सुधा-सिञ्चनें.

मुम्बई १६।२।३१

# प्रीतीचें मार्दव

सखे, प्रीतीचें । मज मार्दव निशिदिनिं जाचे

वदन-कलिका फुलवायातें
क्षणांत ओंठीं विद्युत् स्फुरते—
ओंठ भिडवितां हृदय कांपतें
फूल कलिकेचें । कुस्करून कां जायाचें ?

स्मृति–फलकावर चित्रें सुन्दर
चितारिलीं जीं अपुरीं त्यांवर
कला–पूर्तिची छटा देइं जर—
तिथें उडायचे । कां फवारेच रक्ताचे ?

प्रीति-मन्दिरीं आळविण्या जर
गीत रचियलें भाव-मनोहर—
जड-हृदयांतुनि तें गीत-स्वर
न उमटायाचे । कां ठरलेंच एकदांचें ?

प्रिया-हृत्-कमल-मधु सांठवुनी—
प्रीति-चषक ठेवियला भरुनी—
ओंठीं लावितां जहर त्यांतुनी
जर उसळायचें । कां मृत्यूच दूर नाचे ?

चारु-कल्पना एकवटोनी
तिलोत्तमा जी सजवियली मनिं—
हृदयीं धरितां अधीर होउनि
कां जीविताचे । तिथ ही विचके उडायचे ?

मुम्बईः १९।२।३१

# स्वागत

भावनावश होऊन प्रिया-राधनासाठीं केलेली तयारी जर स्वतःच उधळून लाविली तर खालील उत्तराशिवाय दुसरा कोणता व्यपदेश देणार ?
पण हृन्मीलनाला बाह्य उपाधि हव्यातच कां ?

तव स्वागता जें जें मी विरचिलें
हृदय-सम्भ्रमें व्यर्थ असें जाहलें

दंव-स्नात ही टप्पोरीं ग फुलें
गडे, मोतियांचीं फुलें
आणाया मी विश्व धुण्डाळिलें
तुजसाठीं धुण्डाळिलें
परि तव । मुख-कमलाशीं चुम्बन-बन्धीं
करितिल स्पर्धा प्रणय-च्छन्दी
सखये, म्हणुनी चुरडुनि त्यां टाकिलें
अवचित । जाहलें त्वदागमन मङ्गले,
स्वागत कैसें ?—हृदय भङ्गलें—
त्याच चुम्बनें भारुनि तुज टाकिलें

तूं येशिल म्हणुनि शय्या सजविली
    अयि, नाजुकशी सजविली--
रुतेल तीहि म्हणुनी वरि पसरिली
    सुम-सरिता ही पसरिली
परितव। कोमल-तनु-आलिङ्गन-बन्धीं
    स्पर्श-सुखाची मिळेल सन्धी
सखये, ह्मणुनी तुडवुनि तिज टाकिलें
अवचित। जाहलें त्वदागमन राजसे,-
    हृदय धडधडे—स्वागत कैसें ?
अन् मुग्धे, तुज तसेंच आलिङ्गिलें

मुम्बई २०।२।३१

# चाळा

पारिजात झाडापाठीं
लपला अमुचा जगजेठी
अल्लड माझा राजा ग.

गोप-बाला हंसल्या म्हणुनि
येतां राज्य बसला रुसुनि
रडवा माझा राजा ग.

राखि राधा कानीं वदतां
समजूत पडे प्रेम-रता
भोळा माझा राजा ग.

चन्द्र-वदन अमुचा कान्हा
गुलाब खुलले हंसतांना
हंसरा माझा राजा ग.

आणि दुडुदुडु धांवतांना
कौतुकती नन्द-नन्दना
अचपळ माझा राजा ग.

"हरि कां पडला अगबाई ?"
धांवली यशोदा-माई
'ओगी' माझा राजा ग.

माऊलीचें थान पितां
सांवळा विसरला जगता
लबाड माझा राजा ग

मुम्बई: २३।२।३१.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
साधना: अनुक्रमांक ............ वि. ............ ओढ.
क्रमांक ............ नों: दि: ......

# ओढ

ओढाळ हें मन धांवे जैं अजाण
हृदयाची आण साम्भाळीतें
मूर्त दिसे डोळां तव वेळोवेळां
चञ्चल हा चाळा जाई दूर
भेट नाहीं झाली कधींही आपुली
हृदयाची बोली बोलवीतें
भावनेचा खेळ, हृदयाचा काळ
वेळ अन् अवेळ कांहीं नसे.
"भावना-लहरी उमटती तरी
प्रेमाची बांसरी वाजतसे."

मुम्बई २१।९।३०

# भारत स्वतन्त्र हा झाला

सर्व— “भारत स्वतन्त्र हा झाला—
भारत स्वतन्त्र हा झाला” ॥धृ०॥

प्रमुख—“नव-चैतन्यें देह सळाळे
मधु-सौन्दर्यें मानस धालें
सत्-पावित्र्यें आत्मा डोले
एकाएकीं चहूंकडोनी
दुर्दैन्याचे पाश तोडुनी
नाद नभीं मग दुमदुमणार—”

सर्व— “नाद नभीं मग दुमदुमणार—
भारत स्वतन्त्र हा झाला—
भारत स्वतन्त्र हा झाला” ॥१॥

प्रमुख— “न विषमतेला येथें थारा
ना फुकट्यांना मिळणें चारा
दलित-जनांना येथ निवारा

तरि सारे अम्हीं कामकरी
कष्टाची उपभोगुं भाकरी
नाद असा मग दुमदुमणार—"
सर्व-- "नाद नभीं मग दुमदुमणार--
भारत स्वतन्त्र हा झाला--
भारत स्वतन्त्र हा झाला" ॥२॥

प्रमुख-- "जय-नादानें विश्व निनादे
सत्याधिष्ठित सत्ता नान्दे
समृद्धीनें जग हें कोन्दे
सशास्त्रदृष्टया आचरतांना
तत्त्वें नच तीं विस्मरतांना
नाद न कां मग दुमदुमणार--"
सर्व-- "नाद नभीं मग दुमदुमणार—
भारत स्वतन्त्र हा झाला-
भारत स्वतन्त्र हा झाला." ॥३॥

कराची: ३१।१०।३०

REFBK-0004503
REFBK-0004503

# अञ्जलि

सृष्टीच्या उघड्या वनीं विहरतां
जें मी इथें पाहिलें
प्रेमानें तुजला सदा स्मरुनियां
तें तें हृदीं ठेविलें
त्या माझ्या हृदयांत काव्य भरिसी–
वेणूंत जैसें पुरा
ती ही 'काव्य-सुधा' तुझीच तुजला
अर्पीतसें सुन्दरा.

कराची: ११।७।२७

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8403
संग्रह शाखा

॥ इति शम् ॥



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28344 वि. काव्य
क्रमांक 1848 नों. दि. 23/3/60